# मिरा भाईंदर महानगरपालिका

**स्व इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता.जि. ठाणे, 401 101.**

**दुरध्वनी क्र. 28192828/28193087.**


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

वाचा :-
1. शासन निर्णय क्र. वेतन - 1119/प्र.क्र.-3/2019/सेवा-3, दि.2 मार्च 2019.
2. शासन निर्णय क्र.एसआरव्ही-2018/प्र.क्र.159/कार्या-12, दि.01 ऑगस्ट, 2019.
3. मा. महासभा दि.20/02/2020, ठराव क्र.101 अन्वये सातवा वेतन आयोग लागु करणेस मंजुरी
4. मिरा भाईंदर महानगरपालिका सेवा (सेवा भरती व सेवांचे वर्गीकरण) नियम- 2014.
5. मिरा भाईंदर महानगरपालिका सेवा (सेवा भरती व सेवांचे वर्गीकरण) नियम- 2019.
6. जा.क्र. मिभाम-1120/प्र.क्र.39/नवि-28, दि.15 ऑक्टोबर 2020 (7वा वेतन आयोगाच्या शिफारशी लागु.)
7. शासन निर्णय मिभाम-1116/प्र.क्र.36(भाग-1)/16/नवि-28, दि.26/02/2019 अन्वये मंजूर आकृतीबंध.
8. मा. आयुक्त यांची दि.01/01/2021, रोजीची मंजुर टिप्पणी.
9. मा. विभागीय पदोन्नती निवड समिती दि.23/07/2024 रोजीची बैठकीचे इतिवृत्तांत.

---

मिरा भाईंदर महानगरपालिका
आस्थापना विभाग,
जा.क्र.मनपा/आस्था/1304/2024-25
दि. 05/08/2024

<u>आदेश</u>

विषय :- मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील लिपीक (वर्ग-3) च्या कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगाप्रमाणे तीन लाभांची सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना अनुज्ञेय करणेबाबत.

सातव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार शासकीय कर्मचारी/अधिकारी यांना 10,20 व 30 वर्षाच्या नियमित सेवेनंतरची तीन लाभांची सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना संदर्भ क्र.01 वरील शासन निर्णयान्वये दि.01/01/2016, पासून अनुज्ञेय करण्यात आली आहे.

सातव्या आयेगामध्ये तीन लाभांची सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना वेतन मॅट्रीक्समधील वेतनस्तर एस-20 पर्यंत वेतन घेणाऱ्या (सहाव्या वेतन आयोगातील पे बॅंड रु. 15600-39100 व ग्रेड पे रु.5400/- या वेतन संरचनेशी समकक्ष) अधिकाऱ्यांना लागु राहील. संबंधित अधिकारी हे कोणत्याही कारणामुळे वेतनस्तर एस-21 मध्ये वेतन आहरीत करु लागतील, तेव्हा त्यांना उपरोक्त नवीन योजनेंतर्गत लाभ अनुज्ञेय राहणार नाही.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील लिपीक (वर्ग-03) च्या कर्मचाऱ्यांना मिरा भाईंदर महानगरपालिका सेवा (सेवाभरती व सेवांचे वर्गीकरण) नियम-2014 अन्वये महानगरपालिका आस्थापनेवरील लिपीक (वर्ग-03) चे कार्यरत कर्मचारी यांना सातव्या वेतन आयोगाप्रमाणे (S-6 19900-63200) या वेतनश्रेणीत सतत 20 वर्ष सेवा पूर्ण केल्यामुळे सेवांतर्गत आश्वासित प्रगती

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता.जि. ठाणे, 401 101.

दुरध्वनी क्र. 28192828/28193087.


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

योजनेचा दुसरा लाभासाठी वरिष्ठ पद "मुख्य लिपीक" असून पदाची वेतनश्रेणी (S-13 35400-112400) दि.23/07/2024 रोजीचे मा. विभागीय पदोन्नती निवड समितीने अनुज्ञेय लाभ मंजूर करण्यास मान्यता दिली आहे.

दि.01/08/2019 रोजीच्या शासन निर्णयान्वये महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील वर्ग-3 संवर्गातील कार्यरत पदावर नियमित सेवेची 20 वर्ष पूर्ण झालेल्या खालील तक्त्यात नमूद अधिकारी/कर्मचारी यांना तीन लाभांच्या सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा दुसरा लाभ त्यांच्या नावासमोर स्तंभ-5 मध्ये नमुद केलेल्या दिनांकापासून अनुज्ञेय करण्यात येत आहे.

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे / कर्मचाऱ्याचे नाव | लिपीक (वर्ग-03) च्या पदावर नियुक्ती दिनांक | लिपीक (वर्ग-03) च्या पदावर 20 वर्ष पूर्ण झाल्याची दिनांक | तीन लाभाच्या सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा दुसरा लाभ अनुज्ञेय होत आहे, ती दिनांक |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 1. | श्री. माधूरी रहाटे (मोघे) | 19/05/1997 | 18/05/2017 | 19/05/2017 |
| 2. | श्री. अजिम शेख | 02/05/1998 | 01/05/2018 | 02/05/2018 |
| 3. | श्री. विनायक शांताराम शिर्के | 02/05/1998 | 01/05/2018 | 02/05/2018 |
| 4. | श्री. दिनेश कानगुडे | 02/07/1998 | 01/07/2018 | 02/07/2018 |

अटी व शर्ती :

1. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग दि.08/06/1995 मधील अट क्र.2 (मा.) : या योजनेअंतगर्त अनुज्ञेय करण्यात आलेल्या लाभामुळे संबंधित अधिकाऱ्यांच्या जबाबदारी आणि कर्तव्यामध्ये वाढ होत नसली तरी नियमित पदोन्नती प्रमाणे पदोन्नतीच्या पदाच्या वेतन संरचनेत वेतन निश्चितीचा लाभ मिळेल. या योजने अंतर्गत वरिष्ठ वेतन संरचना दिल्यानंतर वेतन निश्चिती नियमित पदोन्नतीप्रमाणे होईल मात्र त्याच वेतन संरचनेत नियमित / कार्यात्मक पदोन्नती मिळाल्यानंतर पुन्हा वेतन निश्चितीचा लाभ देय होणार नाही.
2. शासन निर्णय वित्त विभाग दि.02/03/2019 मधील अट क्र. (xx) (2) : कार्यात्मक पदोन्नती नाकारली आहे, अशा अथवा कार्यात्मक पदोन्नतीस अपात्र ठरलेल्या कर्मचारी / अधिकारी यास भविष्यात होणाऱ्या / झालेल्या विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीत, कार्यात्मक पदोन्नतीस पात्र ठरल्यास त्यात कार्यात्मक पदोन्नतीचा कार्यभार स्विकारल्याच्या

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता.जि. ठाणे, 401 101.

दुरध्वनी क्र. 28192828/28193087.


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

दिनांकापासून 10 वर्षाच्या नियमित सेवेनंतर, अन्य विहीत अटी व शर्तीच्या पुर्ततेनंतर, या योजनेअंतर्गत यथास्थिती पहिला / दुसरा / तिसरा लाभ पात्रतेनुसार मंजूर करण्यात येईल.

3. शासन निर्णय वित्त विभाग दि.02/03/2019 मधील अट क्र. (xx) (3) : या योजनेंतर्गत पहिला, दुसरा व तिसरा अथवा तिन्ही लाभ मंजूर केल्यानंतर प्रत्यक्ष पदोन्नती नाकारलेल्या अथवा पदोन्नतीस अपात्र ठरलेल्या कर्मचाऱ्यांना देण्यात आलेले लाभ काढून घेण्यात येतील, तथापि अशा लाभांची वसुली करण्यात येणार नाही. तसेच असे लाभ काढुन घेतल्यानंतर संबंधितांची वेतननिश्चिती ही त्यांना जणु काही या योजनेचे लाभ देण्यात आले नव्हते असे समजून, महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, 1981 मधील नियम 12 च्या तरतुदीनुसार करण्यात येईल.
4. या आदेशान्वये तीन लाभांच्या सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देण्यात आलेल्या कर्मचारी/अधिकाऱ्यांनी शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक पीएवाय-1082/सीआर1100/(एक)/एसईआर-3, दि.06/11/1984 व वित्त विभाग, शासन परिपत्रक वेपुर 2019/प्र.क्र.8/सेवा-9 दि.20/02/2019 नुसार वेतन निश्चितीचा विकल्प दयावयाचा असल्यास तो त्यांनी हे आदेश निर्गमित झालेल्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत दयावा.
5. संबंधित आस्थापना विभाग प्रमुखांनी वरील कर्मचारी/अधिकाऱ्यांची पदोन्नती पदाच्या (वेतनश्रेणी S-13 35400-112400) या वेतन संरचनेतील वेतन निश्चिती त्यांनी दिलेल्या विकल्पानुसार करुन त्यांना या योजनेचा लाभ त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या दिनांक व वेतन संरचनेनुसार देण्यात यावा.
6. महाराष्ट्र शासन, वित्त विभाग शासन परिपत्रक क्रमांक: संकीर्ण-2021/प्र.क्र.52/सेवा-3 दि.22/11/2021 चे सहपत्र(वचनपत्र) भरून देण्यात यावे लागेल.
7. सदरचे आदेश मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या mbmc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेत यावेत.

(रवि पवार)

( मा. आयुक्त यांच्या मान्यतेने )

उप-आयुक्त (मुख्यालय)

मिरा भाईंदर महानगरपालिका

- प्रत माहितीस्तव :-

1. मुख्य लेखापरिक्षक
2. मुख्य लेखाधिकारी
3. आस्थापना निवडनस्ती